# कोणत्याही बाबा-बुवामुळे व्यवस्था बदलणार नाही

म. टा. प्रतिनिधी ■ पुणे
matapune@indiatimes.com

## राजू परुळेकर यांची अण्णांवर टीका

'महात्मा गांधी हे मला माहीत असलेले एकमेव गांधीवादी होते. त्यांनी निर्माण केलेले आत्मक्लेश हे शस्त्र तेच वापरू शकतात. भ्रष्टाचाराविषयी चीड असली तरी कोणत्याही बाबा-बुवामुळे व्यवस्था बदलणार नाही,' असे स्पष्ट मत व्यक्त करून पत्रकार राजू परुळेकर यांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्यावर टीका केली.

स्वच्छ, भारत समृद्ध भारत अभियानाचे (थ्री एस) उद्घाटन परुळेकर यांच्या हस्ते झाले. 'थ्री एस'चे विनय हर्डीकर, निवृत्त बँक प्रशासक दिलीप जोशी, 'महापारेषण'चे अधीक्षक अभियंता शशांक जेवळीकर या वेळी उपस्थित होते.

भ्रष्टाचार व व्यवस्थेविषयी चीड असली तरी पर्यायी व्यवस्थेचा विचार होत नाही, असे सांगून ते म्हणाले, की उत्तरेकडील राज्यांमध्ये आंदोलने होत असताना महाराष्ट्र मात्र शांत आहे. केवळ मुंडे-गडकरी-ठाकरे या वादातच जनता अडकली आहे, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.